# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे–४११ ००७.

दुरध्वनी क्र.
(०२०) २५६०१२६३

---

संदर्भ क्र. : ओएसडी/बीसीयुडी/२१४ दि. २०/१०/२०१४

प्रति,
मा. प्राचार्य /मा. संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
संलग्न महाविद्यालये
व मान्यता प्राप्त शिक्षण संस्था

विषय : विद्यापीठ संशोधन प्रकल्प योजना जिल्हानिहाय लेखे शिबीराबाबत ...

महोदय,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सर्व संलग्न महाविद्यालयामध्ये व मान्यता प्राप्त संस्थांमध्ये शैक्षणिक वर्ष २०१३–१४ अनुदान प्राप्त संशोधन प्रकल्पांच्या पहिल्या हप्त्याचे हिशोब तपासणीयाठी केंद्रिय केंद्रिय लेखे स्विकारण्यासाठी जिल्हानिहाय शिबीर करण्यात येत आहे.

तरी सदर संलग्न महाविद्यालयातील शैक्षणिक व संशोधन समन्वयक यांनी दिलेल्या तारखांप्रमाणे उपस्थित रहावे. सदर शिबीरास महाविद्यालयांतील व संस्था यांचा प्रतिनिधी म्हणून संबंधित शैक्षणिक व संशोधन समन्वयक यांनीच उपस्थित रहावे. ते काही कारणास्थव उपलब्ध नसल्यास महाविद्यालयांतील संबंधित प्राध्यापकांने / लिपिकाने उपस्थित रहावे.

| अ. क्र. | जिल्हा | ठिकाण | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | अहमदनगर व नाशिक | क्लास रूम कॉम्पलेक्स, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | २८/१०/२०१४ | १०.३० ते ०५.०० |
| २ | पुणे ग्रामिण व पुणे शहर | | २९/१०/२०१४ | |
| ३ | पुणे शहर | | ३०/१०/२०१४ | |

सदर शिबीरास येताना सोबत जुन २०१४ मध्ये हिशोब तपासणी केलीली फाईल तसेच सन २०१३–१४ या कालावधीतील प्रकल्प मान्यता पत्र व प्रत्यक्षात अनुदान मिळाल्यास चेक नंबर व रक्कम रुपये, लेखा प्रमाणपत्र (Audit Statement), मुळ देयके, Innovation चे प्रमाणपत्र आणणे आवश्यक आहे. एकुण हिशोब सनदी लेखापाल (Chartered

Accountant) यांच्याकडून तपासून लेखा प्रमाणपत्रासह सादर करावा. उपकरणे, साधने यांची (Stock entry) पुस्तकांच्या ग्रंथालयातील नोंदीचा पुरावा व सर्व कागदपत्रांवर मा. प्राचार्यांची सही सादर करणे आवश्यक आहे. हिशोब सादर करताना विद्यापीठाने दिलेल्या नमुन्यात (Annexure I-VI) करण्यात यावा.

या प्रथम हप्त्याचे २०१३ – १४ मध्ये उनुदान मिळलेल्या संशोधन प्रकल्पांच्या हिशोब तपासणीसाठी केंद्रिय पध्दतीने लेखे शिबीर आयोजित केले जाणार नाही. सदर संशोधन प्रकल्प व त्यावरील खर्चाचे हिशोब केंद्रिय लेखे शिबीरा दरम्यान जमा न झाल्यास सदर महाविद्यालय सन २०१४ – १५ मध्ये दिल्या जाणाऱ्या नविन संशोधन प्रकल्पांच्या अनुदानास पात्र राहाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

sd/-

डॉ. रविंद्र जायभाये

विशेष कार्याधिकारी, म.वि.वि.मं.

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी**: वित्त व लेखा अधिकारी,पुणे विद्यापीठ,पुणे ०७